# जागतिक व्यवस्था - शीतयुद्ध आणि शीतयुद्धोत्तर जग

शीतयुद्ध - द्वीध्रुवीय जग
शीतयुद्धोत्तर जग - एकध्रुवीयता, द्वीध्रुवीयता आणि ध्रुवरहीत जग

१.१ परिचय
१.२ एकध्रुवीय जग
संकल्पना
अमेरिका – शीतयुद्धोत्तर युगातील एकध्रुवीय सत्ता
एकध्रुवीयतेचे परिणाम
बहुध्रुवीय जगाचा उदय

## १.१ परिचय

१९९१ मध्ये सोव्हिएट रशियाचे विघटन झाले आणि त्याच्या साम्यवादी साम्राज्याचा अंत झाला. त्याबरोबरच शीतयुद्धही संपले. शीतयुद्ध दुस-या महायुद्धानंतरच्या काळात आंतरराष्ट्रीय संबंधांच्या केंद्र स्थानी होते. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पश्चिम युरोपिय राष्ट्रांचा गट आणि सोव्हिएट रशियाच्या नेतृत्वाखालील साम्यवादी राष्ट्रांचा गट यांच्या मध्ये सुरु झालेला सामरिक (Strategic) आणि राजकीय संघर्ष म्हणजे शीत युद्ध . शीत युद्धाच्या दरम्यान राष्ट्रांच्या या दोन गटांमधील संबंध अत्यंत तणावाचे होते. प्रत्येक गट स्वतःला मजबूत करुन दुस-याला कमकुवत करण्यासाठी डावपेच आखत होता, प्रत्यक्ष युद्ध होत नव्हते इतकेच. या काळात वैचारिक संघर्ष शिगेला पोहोचला होता. दोन्ही गटांचा एकमेकांवर काडीइतकाही विश्वास उरला नव्हता. दोन्ही गट सतत राजनैतिक डावपेच खेळण्यात मग्न होते. लष्करी स्पर्धा, शस्त्रास्त्रांची स्पर्धा, हेरगिरी हेही सर्व चालू होते.

शीतयुद्धाच्या काळात अमेरिकन आणि सोव्हिएट गटामध्ये प्रचंड संघर्ष, तणाव आणि स्पर्धा होती. या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाची दिशा या दोन सत्तागटांमधील आणि विचारप्रणालींमधील तीव्र संघर्षाच्या आधारावरच ठरत होती. अमेरिकन गट भांडवलशाहीचा पुरस्कार करीत होता तर रशियन गट साम्यवादी विचारसरणीचा.

साम्यवादी सोव्हिएट युनियन मध्ये साम्यवादी पक्षाचा महासचिव हा देशातील सर्वोच्च सत्ताधीश मानला जात असे. १९८५ मध्ये मिखाईल गोर्बाचेव्ह यांची या पदावर नियुक्ती झाली. त्यांनी आपल्या विशेष धोरणांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाची दिशाच बदलून टाकली. त्यांनी ग्लासनोस्त आणि पेरेस्त्रॉइका हे दोन कार्यक्रम राबविण्यास

सुरवात केली. (ग्लासनोस्त आणि पेरेस्त्रॉइका हे दोन्ही रशियन शब्द आहेत. ग्लासनोस्त म्हणजे खुलेपणा आणि पेरेस्त्रॉइका म्हणजे पुनर्बांधणी - व्यवस्थेतील खुलेपणा आणि व्यवस्थेची पुनर्बांधणी असा याचा साधारण अर्थ होतो.) ग्लासनोस्त आणि पेरेस्त्रॉइका मुळे रशियामध्ये नाट्यमय बदल होण्यास सुरवात झाली. गोर्बाचेव्ह यांनी अमेरिकेबरोबर मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करण्याचे धोरण स्वीकारले. या घडामोडींपासून प्रेरणा घेवून पूर्व युरोपातील सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखालील साम्यवादी राष्ट्रांनी स्वंनिर्णयाचा अधिकार वापरून स्वातंत्र्य घोषित करण्यास सुरवात केली. १९८९ मध्ये जनतेने बर्लिनची कुप्रसिद्ध भींत जमीनदोस्त केली. या सर्व घटनांमुळे शीतयुद्ध समाप्त झाले.

सोव्हिएट युनियनच्या पाडावामुळे द्वीध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्था नष्ट होवून एकध्रुवीय व्यवस्था निर्माण झाली. शीतयुद्धोत्तर काळात अमेरिकेची ताकद आणि तिचा प्रभाव प्रचंड वाढला. प्रगत अर्थव्यवस्था, भक्कम पायावर आधारित आणि मोठी परंपरा असलेली लोकशाही व्यवस्था आणि सर्वोच्च लष्करी ताकद या घटकांमुळे अमेरिका सर्वशक्तीमान राष्ट्र आणि एकध्रुवीय सत्ता या स्वरुपात जगापुढे आली. शीतयुद्ध संपल्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला . जागतिक अर्थव्यवस्था अधिकाधिक एकसंध होण्यास मदत झाली आहे.

परंतु शीतयुद्ध संपल्यामुळे किंवा ते संपता संपता झालेल्या नाट्यमय बदलांमुळे शांत , स्थिर आणि सुरक्षित जागतिक व्यवस्था निर्माण झालेली नाही. विविध वंश, जमाती आणि धर्मांमधील संघर्ष वाढीस लागले आहेत. त्यांच्या मुळे राष्ट्राराष्ट्रांमधील संघर्षही वाढले आहेत. जगभर दारिद्र्य वाढते आहे. वाढते औद्योगिकरण आणि वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचा -हास होत आहे. मानवी सुरक्षा ही नविन संकल्पना अलिकडे बरीच चर्चेत आली आहे. मानवी सुरक्षा म्हणजे भूक, रोग, अत्याचार आणि दैनंदीन जीवन विस्कळीत होण्यापासून सुरक्षा.

१.२ एकध्रुवीय जग

एकध्रुवीयता ही संकल्पना समजावून घेण्याआधी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात ध्रुव या संकल्पनेचा अर्थ काय होतो ते समजावून घेणे आवश्यक आहे. ध्रुव किंवा ध्रुवीयता हा शब्द आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील सत्तेच्या वाटपाचे वर्णन करण्यासाठी वापरला जातो. रॉबर्ट इ. ऑसगुड आणि रॉबर्ट डब्ल्यु टकर यांच्यामते ध्रुवीय व्यवस्थेमध्ये एक राष्ट्र किंवा काही मित्र राष्ट्रांचे एक लष्करी सत्ताकेंद्र असते. त्या सत्ताकेंद्राचा जगाच्या विशिष्ठ भागातील सत्तासंतूलनावर मोठा प्रभाव असतो. त्यांचे विशिष्ठ हितसंबंध असतात. त्यांच्या सारख्याच दुस-या

सत्ताकेंद्रांपेक्षा हे हितसंबंध वेगळे, विरोधी असतात, त्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी ही सत्ताकेंद्रे बांधील असतात, आणि त्या ही सत्ताकेंद्रे एकमेकांशी युद्धही करु शकतात. ध्रुवीय व्यवस्था आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे नेमके वर्णन करते. एकध्रुवीय, द्वीध्रुवीय आणि बहुध्रुवीय अशा तीन व्यवस्था परंपरेने मानण्यात येतात.

**एकध्रुवीय व्यवस्था**

ज्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये केवळ एकाच राष्ट्राच्या हाती बहुतांश सांस्कृतिक, आर्थिक आणि लष्करी सेवा एकवटलेली असते त्या व्यवस्थेला एकध्रुवीय व्यवस्था असे म्हणतात. आधुनिक युगाच्या आधी जगभर प्रभाव असलेली एकध्रुवीय व्यवस्था निर्माण होणे कठीण होते. त्या काळात इतर राष्ट्रांबद्दल माहिती उपलब्ध होणे शक्य नव्हते. तितकी संपर्क साधने उपलब्ध नव्हती. तरीही काही जागतिक पातळीवर प्रभाव असलेल्या व्यवस्था त्याकाळात निर्माण झाल्या. उदा. १५ ते १७ व्या शतकातील तुर्कांचे साम्राज्य, १८ व्या आणि १९ व्या शतकातील ब्रिटीश साम्राज्य आणि शीतयुद्धोत्तर काळातील अमेरिका ही त्याची उदाहरणे आहेत.

**द्वीध्रुवीय व्यवस्था**

या व्यवस्थेमध्ये सांस्कृतिक, आर्थिक आणि लष्करी सत्ता दोन राष्ट्रांमध्ये विभागलेली असते. ही राष्ट्रे जगाच्या सर्व भागात आपली प्रभाव क्षेत्रे निर्माण करतात. उदा. शीतयुद्धाच्या काळात पश्चिम युरोपातील बरीचशी राष्ट्रे अमेरिकेच्या प्रभावाखाली होती तर पूर्व युरोपातील राष्ट्रे सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली होती. दोन्ही सत्ता कोणाच्याही प्रभावाखाली नसलेल्या राष्ट्रांना आपल्या बाजूला खेचण्याचा प्रयत्न करीत राहतात. उदा. अमेरिका आणि रशिया शीतयुद्धाच्या काळात अलिप्ततेचे धोरण मानणा-या भारताला नेहमीच आपल्या बाजूला खेचण्याचा प्रयत्न करीत होते.

**बहुध्रुवीय व्यवस्था**

या व्यव्सथेअंतर्गत आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक ‘ध्रुव’ किंवा अनेक सत्ताकेंद्रे असतात. या व्यवस्थेमध्ये परस्पर सहकार्याची भावना असू शकते. मोठ्या शक्ती एकत्रित येवून काम करतात, व्यवस्थेला शिस्त असते, शिस्तभंग करणा-यावर कारवाई होवू शकते. अनेक सत्ताकेंद्रांमध्ये सत्ता स्पर्धा असते आणि जेव्हा सत्ता संतुलन बिघडते तेव्हा संघर्ष होण्याचा धोका असतो. पहिल्या महायुद्धाच्या आधी युरोपमध्ये याप्रकारची बहुध्रुवीय व्यवस्था होती. काही अभ्यासकांना आजची आंतरराष्ट्रीय व्यवस्था बहुध्रुवीय आहे असे वाटते कारण त्यांच्या मते चीन, युरोपियन युनियन,

भारत, जपान, रशिया आणि अमेरिका या राष्ट्रांमध्ये जगाची निम्म्याहून अधिक लोकसंख्या राहते, जगाच्या एकूण उत्पन्नापैकी ७५ टक्के उत्पन्न या देशांमधून येते आणि जगातील सर्व देशांच्या सुरक्षेवरील खर्चाच्या ८० टक्के खर्च हे देश करतात.

विसाव्या शतकाच्या सुरवातीला बहुध्रुवीय व्यवस्था अस्तित्वात होती. दुस-या महायुद्धानंतर द्वीध्रुवीय व्यवस्था निर्माण झाली. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या दोन महासत्ता उदयास आल्या. शीतयुद्ध संपल्या नंतर आणि सोव्हिएट रशियाचा अंत झाल्या नंतर द्वीध्रुवीय व्यवस्थेची जागा एकध्रुवीय व्यवस्थेने घेतली. आज ही व्यवस्था अमेरिकेच्या ताब्यात आहे. अनेक अभ्यासकांच्या मते शीतयुद्धानंतर अमेरिका एक मोठी ताकद म्हणून उदयास आली आहे. तिच्याकडे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला पाहिजे तसा आकार देण्याची अभूतपूर्व ताकद निर्माण झाली आहे. अमेरिकेकडे जगावर ताबा मिळवण्याची महत्वाकांक्षा आहे, वाढत जाणारी अर्थव्यवस्था, अण्वस्त्रे, विचारप्रणाली आणि तंत्रज्ञान आहे. या सर्वाच्या जोरावर अमेरिका एक मोठे सत्ताकेंद्र म्हणून बराच काळ टिकून राहू शकते.

चार्ल्स क्रॉथॅमर यांनी १९९१ मध्ये फॉरिन अफेअर्स या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या दी युनिपोलर मोमेंट ( The Unipolar moment) या आपल्या लेखात मांडलेले विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात, “शीतयुद्धोत्तर जगाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे एकध्रुवीयता. काही काळानंतर बहुध्रुवीय व्यवस्था अस्तित्वात येईल यात शंका नाही. कदाचित एका पिढीनंतर अमेरिकेला समांतर महासत्ता निर्माण होतील. जगाचे स्वरुप पहिल्या महायुद्धापूर्वीसारखे होईल. पण हे होण्याला अजून काही दशके निश्चितपणे जावी लागतील. सध्याचे जग हे एकध्रुवीय जग आहे. आज दुस-या दर्जाच्या महासत्ता अनेक आहेत. जर्मनी आणि जपानकडे आर्थिक ताकद आहे. ब्रिटन आणि फ्रान्स कडे राजनैतिक आणि लष्करी ताकद आहे. सोव्हिएट युनियनकडे लष्करी, राजनैतिक आणि राजकीय सत्ता आहे, पण दिवसेंदिवस ती कमी होत चालली आहे. आज जगात पहिल्या दर्जाची केवळ एकच सत्ता आहे आणि नजीकच्या भविष्यकाळात तिच्याशी स्पर्धा करु शकेल अशी सत्ता निर्माण होण्याची शक्यता नाही.”

### एकध्रुवीय व्यवस्थेचे समर्थक

साधारणपणे शीतयुद्धोत्तर व्यवस्थेच्या विश्लेषणाची सुरवात एकध्रुवीयतेच्या संकल्पनेपासून होते. एकध्रुवीयतेच्या समर्थनार्थ खालील विधाने मांडली जातातः-

अ) अमेरिकेला सोव्हिएट रशिया आणि शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये नव्याने मान्यता आणि बळ प्राप्त झाले आहे. जपान, जर्मनी, फ्रान्स, रशिया चीन, युरोपियन युनियन, अलिप्ततावादी राष्ट्रांची चळवळ किंवा संयुक्त राष्ट्रे यापैकी कोणीच अमेरिकेला नियंत्रणात ठेवू शकत नाहीत. रशियाने आपली अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडून घेतली आहे. जर्मनी आणि जपान अमेरिकेच्या नेतृत्वाखालील व्यवस्थेमध्ये राहण्यातच धन्यता मानतात. स्थिर युरोपसाठी अमेरिकेचे अस्तित्व आवश्यक आहे, अमेरिकेची जागा दुसरे कोणीच घेवू शकणार नाही ( irreplaceable) असे विधान १९९४ मध्ये जर्मनीचे चॅन्सलर हेलमेट कोहोल यांनी केले होते. पूर्व आशियामध्ये अमेरिकेने आपले लष्करी अस्तित्व कायम ठेवावे असे जपानचे मत आहे. दुस-या बाजूला जपानने आपले स्वतःची लष्करी ताकद कमी करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे जर्मनी आणि जपान सध्याच्या एकध्रुवीय जगाला विरोध करण्यापेक्षा त्याचे समर्थनच करतात आणि तसेच करीत राहतील असे म्हणावे लागते. वेगाने वाढणारा चीन अमेरिकेच्या शक्तीला आव्हान देवू शकणारे राष्ट्र म्हणून ओळखले जाते. आपण एक जबाबदार शक्ती म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणात ओळखले जावे असे चीनला वाटते. परंतु चीनला महासत्ता म्हणून विकसित होण्यास काही काळ लागेल.

आ) शीतयुद्धानंतर अमेरिकेने आपले प्रथम स्थान अबाधित ठेवले आहे. सॅम्युअल हंटींगटन यांच्या मते ज्या देशाला इतर देशांच्या धोरणावर इतर सर्वांपेक्षा अधिक प्रभाव टाकता येतो त्या देशाला प्रथम स्थान मिळते. अमेरिकेकडे असलेल्या विविध साधनांच्या आधारे तिचे बळ निश्चित झाले आहे. यामध्ये लोकसंख्या, भूप्रदेश, नैसर्गीक संसाधने, आर्थिक क्षमता, लष्करी ताकद, राजकीय स्थिरता, आणि सर्वार्थाने सक्षम व्यवस्था ही अमेरिकेची बलस्थाने आहेत. त्यांच्या मुळेच जागतिक राजकारणात अमेरिकेचे स्थान भक्कम झाले आहे. ती इतर महासत्तांपेक्षा सरस ठरली आहे.

इ) अमेरिकेचे लष्करी सामर्थ्य इतर सर्व देशांपेक्षा कितीतरी पटींनी अधिक आहे. अमेरिकेच्या नौदलचा आकार तिच्या नंतरच्या १७ नौदलांच्या एकत्रित आकाराएवढा आहे. तंत्रज्ञानाच्या दृष्टीने ते जगाच्या कितीतरी पुढे आहेत. चीन फ्रान्स, भारत, जर्मनी, जपान, रशिया आणि ब्रिटन यांच्या एकत्रित संरक्षणावरील खर्चापेक्षा अधिक खर्च एकट्या अमेरिकेचा आहे. जिथे गरज लागेल तिथे आपल्या लष्करी ताकदीचे प्रदर्शन करु शकणारा अमेरिका हा एकमेव देश आहे.

ई) शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिकेने जागतिक घडामोडींमध्ये आघडीची आणि प्रभावी भूमिका घेतली आहे. खालील प्रसंगांमधून ते स्पष्ट होईल.

१९९० मध्ये इराकने कुवेतवर आक्रमण करुन कुवेत ताब्यात घेतला. शीतयुद्धानंतरच्या जगातील हा पहिला पेचप्रसंग होता. या प्रसंगामुळे एकध्रुवीय जगातील महसत्ता म्हणून अमेरिका पुढे आली. अमेरिकेने सौदी अरेबियामध्ये मोठ्या प्रमाणावर सैन्य पाठवले, संयुक्त राष्ट्रांनी इराकवर आर्थिक निर्बंध घालावेत म्हणून दबाव आणला. जगातील अनेक देशांनी अमेरिकेच्या या धोरणाला पाठिंबा दिला. यामध्ये मध्यपूर्वेतील काही देशांचाही समावेश होता. अमेरिकेने इराक विरुद्ध सुरू केलेल्या युद्धामुळे कुवेत स्वतंत्र झाला. (या युद्धाला डेझर्ट स्टॉर्म असे नाव देण्यात आले होते.) वरवर पाहता इराकने कुवेतवर आक्रमण केल्यामुळे इराकवर हल्ला करण्यात आला, त्यामध्ये त्याचा पराभव झाला. पण प्रत्यक्षात मध्यपूर्वेतील तेलक्षेत्रावर असलेले अमेरिकेचे नियंत्रण कायम राखण्यासाठी हा हल्ला करण्यात आला होता. अमेरिकेच्या इच्छेचे आणि तिच्या प्रचंड तांत्रिक क्षमतेचे प्रदर्शन ही आंतरराष्ट्रीय घडामोडींमधील महत्त्वाची घटना ठरली. मध्यपूर्वेत अमेरिकेने शांतता करार घडवून आणण्याचे प्रयत्न केले. सप्टेंबर १९९३ मध्ये अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी व्हाईट हाऊस मध्ये इस्त्राइल आणि पॅलेस्टाईन मुक्ती संघटनेमध्ये शांतता करारावर सह्या करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले. जुलै १९९४ मध्ये इस्त्राइल आणि जॉर्डन यांच्यामध्ये याच प्रकारचा शांतता करार करण्यात आला त्यामध्येही अमेरिकेने पुढाकार घेतला होता.

पूर्वाश्रमीच्या युगोस्लाविया मधील बोस्निया, सर्बिया आणि क्रोएशिया या भागातील लोकांच्या संघर्षाचा प्रश्न सुटावा यासाठी अमेरिकेने विशेष प्रयत्न केले. नोव्हेंबर १९९५ मध्ये अमेरिकेत ओहियो



राज्यातील डायटन येथे बोस्नियातील मुस्लिम, तसेच सर्बियन आणि क्रोएशियन लढावू गटांमध्ये शांतता बोलणी घडवून आणण्यात आली.

त्यामधूनच एक शांतता करार करण्यात आला. या कराराचा एक भाग म्हणून अमेरिकेने बोस्निया आणि हर्झेगोविनामध्ये नाटोच्या सैन्याच्या मदतीला अमेरिकेचे सैन्य पाठविण्याचे मान्य केले. हे सैन्य या भागात मानवी सहाय्यता पुरविणार होते. तसेच या भागात शांतता राखण्यासाठा प्रयत्न करणार होते.

मध्य अमेरिकेमध्ये अमेरिकेने हैटी आणि मेक्सिकोला मदत करण्यात पुढाकार घेतला. १९९१ मध्ये लष्करी कटानंतर सत्तेमधून बाहेर फेकल्या गेलेल्या हैटीच्या निर्वाचित अध्यक्षांना पुन्हा सत्तेवर आणण्यासाठी सप्टेंबर १९९४ मध्ये अमेरिकेने मदत केली.

ऑगस्ट १९९८ मध्ये केनिया आणि टाझानिया मधील अमेरिकन वकिलातींवर अतिरेक्यांनी हल्ले केले. त्यामध्ये २५० निरपराध नागरिक मृत्यूमुखी पडले. अमेरिकेने एकाचवेळी अफगाणिस्तान मधील अतिरेक्यांच्या एका अड्ड्यावर आणि सुदानमधील रासायनिक शस्त्रे बनवणा-या कारखान्यावर हल्ला करुन त्याचा जवाब दिला. या दोन ठिकाणांवर वकिलातींवर हल्ला करण्याचा कट शिजल्याचा संशय होता.

दहशतवाद्यानी ११ सप्टेंबर २००१ रोजी न्यूय़र्क मध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटरवर केलेल्या हल्ल्यानंतर ऑक्टोबर २००१ मध्ये अमेरिका आणि ब्रिटनने अफगाणिस्तानवर हल्ला केला. ती दहशतवादाविरुद्धच्या युद्धाची सुरवात होती. ओसामा बिन लादेनला पकडणे, अल कायदा ही त्याची संघटना उध्वस्त करणे तसेच त्याना मदत करणारी तालिबान राजवट संपवणे ही या युद्धाची जाहीर केलेली उद्दीष्टे होती.

मार्च २००३ मध्ये अमेरिकेने इराकवर हल्ला केला. या हल्ल्याला रशिया, जर्मनी, फ्रान्स, चीन या प्रमुख देशांचा आणि संयुक्त राष्ट्रांचा विरोध होता. परंतु अमेरिकेने त्याला विशेष महत्त्व दिले नाही. ब्रिटन, डेन्मार्क, पोलंड
आणि ऑस्ट्रेलिया या देशांनी अमेरिकेला पाठिंबा दिला. या हल्ल्याच्या समर्थनार्थ अमेरिकेने दोन कारणे दिली - एक इराककडे संहारक अस्त्रे आहेत आणि अजूनही तो त्यांची निर्मिती करीत आहे. त्यामुळे १९९१ मधील कराराचा भंग होतो. २) इराकचे अल कायदा बरोबर घनिष्ठ संबंध आहेत आणि इराक त्याना मदत करीत आहे. परंतु या हल्ल्यामागची मुख्य उद्दीष्टे वेगळीच होती. इराकचे तत्कालीन अध्यक्ष सद्दाम हुसेन यांनी अमेरिकेच्या हितसंबंधांना बाधा आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी रशियाला मदत करण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यामुळे अमेरिकेचे त्या भागातील तेलावरील

नियंत्रण धोक्यात येत होते. या सर्व कारणांमुळे अमेरिकेने सद्दाम हुसेन यांची राजवट उलथून टाकली.

लष्करी ताकदीबरोबरच अमेरिकेची आर्थिक ताकद मोठी आहे जागतिक उत्पादनामध्ये अमेरिकेचा वाटा २० टक्के इतका मोठा आहे. अमेरिकेची अर्थव्यवस्था जगात सर्वात मोठी आहे. आपल्या मित्र राष्ट्रांबरोबर अमेरिका आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक या दोन महत्त्वाच्या जागतिक आर्थिक संस्थांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. या दोन्ही संस्था त्यांच्या कडून कर्ज घेणा-या राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक धोरणांवर आपला फ्रभाव टाकतात. त्यांना नवउदारमतवादी धोरण स्वीकारण्यास भाग पाडतात. जगभर खुल्या बाजारपेठेची व्यवस्था स्थापन करणे हे त्यांचे उद्दीष्ट आहे.

विविध क्षमतांमुळे अमेरिका जगातील अग्रगण्य राष्ट्र म्हणून ओळखली जाते. जोसेफ नाय अमेरिकेच्या या ताकदीला असे म्हणतात. जेव्हा एखादा देश केवळ आपल्या संस्कृती आणि विचारप्रणालीच्या आधारावर आपल्या हितसंबंधांना पोषक असे नियम आणि संस्था बनवू शकतो तेव्हा त्या देशाकडे ‘ सॉफ्ट पॉवर’ आहे असे मानावे लागते. लष्करी ताकद, माहिती तंत्रज्ञान, उदारमतवादी लोकशाही आणि संस्थांच्या प्रती असलेली बांधिलकी या सर्व घटकांमुळे अमेरिकेची ताकद वाढली आहे. या ताकदीचा वापर अमेरिका इतर देशांवर प्रभाव टाकण्यासाठी करते आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत आपले हितसंबंध सुरक्षित राखते.

द्वीध्रुवीय व्यवस्थेची जाग एकध्रुवीय व्यवस्थेने घेतल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या कार्यपद्धतीमध्ये अनेक बदल झाले आहेत. एकध्रुवीयतेमुळे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवर झालेले काही परिणाम खालील प्रमाणेः-

**अमेरिकेचे धोरण**

शीतयुद्ध संपल्यानंतर अमेरिकेने नेहमीच आपले प्रथम स्थान टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या ज्या देशांना अमेरिकेला आव्हान देण्याचा प्रयत्न केला त्यांना अमेरिकेने धडा शिकवला. १९९२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या संरक्षण नियोजन मार्गदर्शिकेमध्ये (Defence policy guidance) अमेरिकेने स्पर्धक निर्माणच होणार नाही याची काळजी घ्यावी असे स्पष्ट नमुद केले आहे.

शीतयुद्धानंतरच्या कालखंडात अमेरिकेने उद्दाम राष्ट्रे, दहशतवाद, आणि संहारक शस्त्रांच्या विरुद्ध चालू केलेल्या युद्धाला राष्ट्रीय हिताच्या दृष्टीकोनातून बरेच महत्त्व दिले आहे. शीतयुद्धानंतर अमेरिकेच्या सत्तेला आव्हान देऊ शकेल अशी सत्ताच

अस्तित्वात नसल्यामुळे अमेरिकेने आपले राष्ट्रीय हितसंबंध जपण्यासाठी लष्करी बळाचा उघड वापर करण्यास सुरवात केली. त्यांचे राजनैतिक धोरणही आक्रमक झाले. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका केवळ छोट्या राष्ट्रांमध्ये सत्ता बदल घडवून आणण्याचे प्रयोग करीत असे. त्या प्रयोगातही स्वतः थेट सामील न होता छुप्या मार्गाने हस्तक्षेप करण्यावर भर दिला जात असे. परंतु शीतयुद्धानंतर अमेरिकेने अफगाणिस्तान (ऑक्टोबर २००१) आणि इराकवर (मार्च २००३) एकतर्फी आक्रमण केले. अनेक विचारवंतांच्या मते केवळ एकध्रुवीय व्यवस्थेमुळे अमेरिकेने हे वर्चस्ववादी धोरण स्वीकारले आहे.

अमेरिकेने संभाव्य धोकादायक शक्तींना आपल्या नेतृत्वाखालील राजकीय आणि आर्थिक संस्थांमध्ये गुंतवून घेतले आहे. त्यांच्या बरोबर विविध पातळ्यांवर संबंध प्रस्थापित करून त्यांना नियंत्रणात ठेवण्याचे धोरण अमेरिकेने आखले आहे. उदा. रशियाला जी-८ राष्ट्रांच्या गटात सामील करून घेण्यात आले आहे. साम्यवादी चीनला सध्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये सामावून घेण्यासाठी अमेरिकेने विशेष प्रयत्न केले. चीनला भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे नियम स्वीकारण्यास भाग पाडले. चीन बरोबरचे संरक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यात आले आहे. त्यामुळे पारदर्शकता वाढेल व गैरसमजुती कमी होतील असे अमेरिकेचे मत आहे. याप्रकारे अमेरिकेने आपल्या संभाव्य स्पर्धकांना एकतर लष्करी ताकदीच्या जोरावर नमवले, सामावून घेतले, किंवा त्यांचा अनुनय करुन ते फारसे विरोधी धोरण अवलंबणार नाहीत याची काळजी घेतली आहे.

**संयुक्त राष्ट्रांचे कार्य**

दुस-या महायुद्धानंतर १९४५ मध्ये मुख्यतः आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची स्थापना करण्यात आली. शीतयुद्धाच्या काळात विचार प्रणालींच्या संघर्षामुळे आणि पूर्व विरुद्ध अशा संघर्षामुळे संयुक्त राष्ट्रांना जागतिक समुदायाच्या अपेक्षा पूर्ण करता आल्या नाहीत. शीतयुद्धानंतर तरी संयुक्त राष्ट्रांना आपले नियोजित कार्य पार पाडता येईल अशी अपेक्षा होती. परंतु तसे काहीच झाले नाही. परिस्थिती जैसे थे राहीली. शीतयुद्धाच्या काळात परस्पर विरोधी भूमिकांमुळे कोणतेच निर्णय होत नसत. आता एकमेव महासत्ता असल्यामुळे अमेरिका संयुक्त राष्ट्रांच्या म्हणण्याकडे फारसे लक्ष देत नाही. शीतयुद्धोत्तर काळात अमेरिकेच्याधोरणांमुळे संयुक्त राष्ट्रांनी आपली विश्वासार्हता गमावली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या भूमिकेला फारसे महत्त्व राहीलेले नाही.

संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्याप्रमाणे सुरक्षा परिषदेला शांततापूर्ण मार्गाने वाद सोडविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. ज्या प्रसंगात शांततेचा भंग होत असेल त्या ठिकाणी शांतता प्रस्थापित करण्यासाठी बळाचा वापर करण्याचा अधिकार सुरक्षा परिषदेला देण्यात आलेला आहे. परंतु शीतयुद्धोत्तर काळात सुरक्षा परिषदेच्या आणि एकूण संयुक्त राष्ट्रांच्या मताला न जुमानता अमेरिकेने काही राष्ट्रांच्या विरोधात बळचा वापर करण्याचा निर्णय घेतला. १९९० मध्ये संयुक्त राष्ट्रांनी परवानगी देण्याअगोदर अमेरिकेने इराकवर हल्ला करण्याच्या दृष्टीने सौदीअरेबियामध्ये आपले सैन्य पाठवले. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली इराकविरुद्धचे युद्ध लढले गेले.

१९९० च्या दशकाच्या सुरवातीला कोसोवोमध्ये सर्बियाच्या शासनाने अल्बानियाच्या मुस्लीम जनतेविरुद्ध हिंसाचाराचे सत्र चालविले होते. या पेचप्रसंगात संयुक्त राष्ट्रांचा परवानगी न घेता अमेरिका आणि नाटोच्या सैन्याने लष्करी हस्तक्षेप केला. परंतु त्यामुळे समस्या सुटली नाही. शेवटी संयुक्त राष्ट्रांच्या शांतता रक्षक दलाला मध्यस्थी करावी लागली.

११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेतील दहशतवादी हल्ल्यानंतर नव्याने जागतिक सुरक्षा व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न सुरु झाले. अफगाणिस्तान आणि इराकवर हल्ला करण्याचा निर्णय अमेरिकेने सुरक्षा परिषदेला डावलून घेतला होता. अमेरिकेच्या या एकतर्फी निर्णयाला चीन, फ्रान्स, रशिया, जर्मनी आणि संयुक्त राष्ट्रांमधील इतर अनेक राष्ट्रांचा विरोध होता. त्यावेळचे महासचिव कोफी अन्नान यांनीही स्पष्ट शब्दात आपला विरोध नोंदविला होता. त्यांच्या मते अमेरिकेची ही कृती संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्याच्या विरोधात होती. प्रत्यक्षात अफगाणिस्तानमधील दहशतवादाविरुद्धचे युद्ध ही नाटोच्या नेतृत्वाखालील लष्करी कारवाई होती. नंतर संयुक्त राष्ट्रांनी त्याला मान्यता दिली.

**विकसनशील राष्ट्रे**

शीतयुद्धाच्या दरम्यान बहुसंख्य विकसरनशील राष्ट्रांनी दोन्ही महासत्तांपासून अलिप्त राहण्याचे धोरण स्वीकारले होते. तटस्थ राहून आंतरराष्ट्रीय राजकारणातील आपली स्वतंत्र भूमिका कायम ठेवण्याचा हा त्यांचा प्रयत्न होता. या सर्व अलिप्त राष्ट्रांची अलिप्ततावादी चळवळ या काळात निर्माण झाली. भारत, इजिप्त आणि युगोस्लाविया या तीन राष्ट्रांनी अलिप्ततावादी चळवळीच्या स्थापनेमध्ये पुढाकार घेतला. बेलग्रेडमध्ये १९६१ साली झालेल्या पहिल्या अलिप्ततावादी परिषदेत[i] २५ राष्ट्रे सहभागी झाली होती. आज या चळवळीचे ११८ सदस्य आहेत. अलिप्त राष्ट्र चळवळ तिस-या जगाचे प्रतिनिधीत्व करते. परंतु द्वीध्रुवीय व्यवस्था नष्ट

झाल्यानंतर अलिप्ततावादी चळवळीचे महत्त्व कमी झाले आहे. आंतरराष्ट्रीय निर्णयप्रक्रियेमध्ये या चळवळीला फारसे महत्त्वाचे स्थान राहिलेले नाही. अमेरिकेची वाढती ताकद आणि अमेरिकेचा संयुक्त राष्ट्रांवरील वाढता प्रभाव याबाबतही ही चळवळ फारसे काही करु शकत नाही. २००६ साली हवाना (क्युबा) येथे झालेल्या अलिप्ततावादी राष्ट्रांच्या शिखर परिषदेत ९२ पानांचा एक राजकीय जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात आला. त्यामध्ये अमेरिकेच्या वर्चस्ववादी धोरणांवर टीका करण्यात आली. एकध्रुवीय व्यवस्थे ऐवजी सर्वांना समान स्थान असलेली, न्यायावर आधारित जागतिक व्यवस्था निर्माण करावी असे मत या जाहिरनाम्यात मांडण्यात आले. संयुक्त राष्ट्रांच्या जाहिरनाम्याचा सन्मान केला जावा, संयुक्त राष्ट्र व्यवस्थेच्या रचनेमध्ये बदल करण्यात यावेत, लोकशाही ही वैश्विक संकल्पना आहे. कोण्या एका राष्ट्राने लोकशाहीची व्याख्या करुन ती जगावर लादण्याचा प्रयत्न करु नये असेही या जाहिरनाम्यात नमुद करण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या एकूण सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्या अलिप्ततावादी चळवळीचे सदस्य आहेत. परंतु अमेरिकेने संयुक्त राष्ट्रांच्या या जाहिरनाम्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. शीतयुद्धोत्तर काळात अलिप्ततावादी चळवळीला आपल्या सदस्य राष्ट्रांमध्ये उद्भवलेल्या पेचप्रसंगातही फारसे काही करता आले नाही. उदा. मध्य पूर्व आणि युगोस्लावियामधील संघर्षात अलिप्ततावादी चळवळीने कोणतीही ठाम भूमिका घेतली नाही. ही चळवळ युगोस्लावियाचे विघटन थांबवू शकली नाही. भारत अजूनही या चळवळीचा सदस्य आहे. सोव्हिएट युनियनच्या पतनानंतर तो अमेरिकेच्या अधिक जवळ गेला आहे. भारत दक्षिण आशियामधील अमेरिकेचा सामरिक भागीदार झाला आहे.

**दक्षिण - उत्तर संबंध**

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर 'तिसरे जग' या संज्ञेला अनेक विश्लेषकांनी आव्हान दिले आहे. भांडवलशाही राष्ट्रांचे पहिले जग आणि साम्यवादी राष्ट्रांचे दुसरे जग यांच्या मधील संघर्ष आता संपला आहे. किंबहुना साम्यवादी राष्ट्रांचे दुसरे जग लयाला गेले आहे, त्यामुळे तिसरे जग या संज्ञेला अर्थ उरत नाही. १९५० च्या दशकामध्ये आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील विसकनशील राष्ट्रांचे वर्णन करण्यासाठी तिसरे जग ही संज्ञा वापरण्यात आली. या भागातील बरेचसे देश दुस-या महायुद्धानंतर स्वतंत्र झाले. हे देश म्हणजे युरोपमधील वसाहतवादी राष्ट्रांच्या वसाहती होत्या. दुस-या महायुद्धानंतर मुख्यतः आर्थिक समस्यांनी ग्रासलेल्या वसाहतवादी राष्ट्रांनी आपल्या वसाहती स्वतंत्र केल्या. अनेक वर्षे आर्थिक शोषण झाल्यामुळे नव्याने स्वतंत्र झालेले हे देश आर्थिक दृष्ट्या मागास होते. हे सर्व देश मुख्यतः जगाच्या दक्षिण भागात आहेत. त्यामुळे या देशांना 'दक्षिण' असे संबोधण्यात येते. तर

जगाच्या उत्तरेकडील औद्योगिकदृष्ट्या संपन्न राष्ट्रांना 'उत्तर' असे संबोधण्यात येते. शीतयुद्ध संपले तरी दक्षिण- आणि उत्तरेकडील देशांमधील राजकीय आणि आर्थिक संबंधांमध्ये फारसा फरक पडला नाही. अमेरिकेने इराकवर केलेला हल्ला, इस्त्राइल - पॅलेस्टाईन संघर्ष, आंतरराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंध, परकीय गुंतवणुक, बौद्धिक संपदा हक्क, पेटंट्स इत्यादी विषयांवरील उत्तर आणि दक्षिणेकडील देशांच्या मतांमध्ये प्रचंड फरक असल्याचे दिसून येते. शीतयुद्धोत्तर काळात या प्रश्नांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**आर्थिक क्षेत्र**

शीतयुद्धादरम्यान पश्चिम आणि पूर्वेकडील देशांमध्ये तिस-या जगातील अधिकाधिक देश आपल्याकडे खेचून घेण्यासाठी स्पर्धा सुरु होती. या काळात अमेरिका उदारमतवादी आर्थिक धोरणांचा पुरस्कार करीत होती. या धोरणांमुळे आर्थिक विकास घडून येईल आणि त्यामुळे आपोआपच समाजवादी आदर्शांच्या विरुद्ध जनमत तयार होईल असा अमेरिकेचा अंदाज होता. याउलट सोव्हिएट युनियनने साम्यवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला होता. केवळ ही व्यवस्था स्वीकारल्यासच नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांना वेगाने विकसित होणे शक्य होईल असे त्यांचे मत होते. १९८९ नंतर सोव्हिएट युनियन आणि त्याच्या नेतृत्वाखालील साम्यावादी व्यवस्था एकापाठोपाठ एक नष्ट होत गेल्या. त्यामुळे १९८९ नंतर जगामध्ये नव-उदारमतवादी व्यवस्थेला स्पर्धा उरली नाही, या व्यवस्थेला गती प्राप्त झाली. त्यामुळेच जागतिकीकरणाची प्रक्रियाही वेगाने घडून आली.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, जागतिक व्यापार संघटना या सर्व जागतिक अर्थसंस्थांवर श्रीमंत आणि बलवान राष्ट्रांचा प्रभाव आहे. दुस-या महायुद्धानंतर अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली आमि जपान या सात आर्थिकदृष्ट्या संपन्न राष्ट्रांनी एकत्रित येऊन जी-७- ग्रेट सेव्हन ही संघटना उभी केली. साम्यवादी रशियाचा विरोध आणि भांडवलवादी राष्ट्रांच्या हिताचे रक्षण ही या संघटनेची दोन उद्दीष्टे होती. शीतयुद्धानंतर रशिया या संघटनेत सामील करून घेण्यात आले. त्यामुळे आता या संघटनेला जी-८ असे संबोधले जाते. या संघटनेचा जागतिक राजकारणावर मोठा प्रभाव आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आणि जागतिक बँक विकसनशील राष्ट्रांना कर्ज देतात. परंतु हे कर्ज घेणा-या राष्ट्रांना काही अटींची पूर्तता करावी लागते. त्यामध्ये अर्थव्यवस्था खुली करणे, परकीय गुंतवणुकदारांना सवलती देणे इत्यादी अटींचा समावेश असतो. या अटींमुळे गरीब राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांवर श्रीमंत राष्ट्रे सहज नियंत्रण ठेवू शकतात.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आणि जागतिक बँकेत सर्व सदस्यांना समान मताधिकार नसतो. प्रत्येक सदस्य राष्ट्राची मते त्याच्या आर्थिक ताकदीवर ठरवली जातात. दोन्ही संस्थांमध्ये अमेरिकेला सर्वाधिक मते आहेत. विकसनशील राष्ट्रांनी या व्यवस्थेची फेररचना करण्याची मागणी केली आहे. जागतिक व्यापार संघटनेमध्ये मात्र प्रत्येक देशाला एक मत आहे. या संघटनेमध्ये विकसनशील राष्ट्रांनी एकत्र येऊन अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान दिले आहे. त्यामुळेच दोहा चर्चा फेरी (Doha Round of Talks) आजर्यंत यशस्वी होऊ शकलेली नाही. भारत, ब्राझिल, चीन, जी-३३ देशांचे नेतृत्व करणारा इडोनेशिया, आफ्रिका, कॅरेबियन आणि पॅसिफिक भागातील विकसनशील देश आणि इतर छोट्या देशांनी दोहा चर्चा फे-यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अलीकडील काही वर्षात विकसनशील देश अन्न सुरक्षेसाठी आणि शेतक-यांचे जीवनमान उंचावण्यासाठी लढत आहेत. अमेरिका, युरोपियन युनियन आणि विकसनशील देशांमध्ये अनेक मुद्यांबाबत मतभेद आहेत. उदा. अमेरिका आपल्या शेतक-यांना देत असलेली सबसीडी, अमेरिका आणि युरोपियन युनियन व्यापाराच्या सुरक्षेसाठी वापरत असलेली तंत्रे इत्यादी मुद्यांवरुन हे वाद आहेत.

**राजकीय आणि सुरक्षेचे क्षेत्र**

उद्दाम राष्ट्रांना शिक्षा करणे, संहारक शस्त्रास्त्रांचा नाश, मानवतावादी दृष्टीकोनातून संघर्षांमध्ये हस्तक्षेप ही अमेरिकेच्या शीतयुद्धोत्तर काळातील परराष्ट्र धोरणातील काही ठळक वैशिष्ट्ये ठरली आहेत. अमेरिका शत्रुबाबत बचावात्मक धोरण स्वीकारणार नाही, जिथे गरज असेल तिथे पहिला हल्ला अमेरिका करेल, हे अमेरिकेच्या प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या सर्व धोरणांमुळे अमेरिकेचे वर्चस्व टिकवून ठेवण्याचे उद्दीष्ट साध्य झाले आहे. इराक आणि युगोस्लाविया मधील लष्करी हस्तक्षेपामुळे अमेरिकेला विरोध करु पाहणा-या इतर राष्ट्रांना योग्य संदेश मिळाला आहे. जिथे अमेरिकेच्या सामरिक आणि आर्थिक हितसंबंधांचा प्रश्न येतो तेथेच अमेरिका हस्तक्षेप करते. रवांडा आणि सुदानमध्ये अमेरिकेचे कोणतेही हितसंबंध नसल्यामुळे अमेरिकेने तिथे निर्माण झालेल्या पेचप्रसंगात कोणताही हस्तक्षेप केलेला नाही.

१९९० पासून अमेरिकेने आपली लष्करी ताकद वापरून राजकीय प्रभाव वाढविण्यावर भर दिला आहे. अमेरिकेचे लष्करी तळ जगभर पसरलेले आहेत. ऑस्ट्रेलिया मधील पाईन गॅप तळ, हिंदी महासागरातील दिएगो गार्सिया येथिल नाविक तळ, क्युबा जवळचा ग्वान्टानामो उपसागरातील नौदलचा तळ ही काही गाजलेली नावे आहेत. याशिवाय युरोप, सौदी अरेबिया, इराक, अफगाणिस्तान, पाकिस्तान, जपान, इक्वॅडोर इत्यादी देशांमध्ये अमेरिकेचे लष्करी तळ आहेत. [ii] अमेरिकेचे लष्करी तंत्रज्ञान इतर देशांच्या मानाने खूपच प्रगत आहे. लांब पल्ल्यावरून अचूक मारा करण्याची ताकद

त्यांच्याकडे आहे. इराकमध्ये १९९० आणि २००३ सालात, अफगाणिस्तानमध्ये २००१-०२ मध्ये आणि युगोस्लावियात अमेरिकेने आपल्या या ताकदीचे प्रदर्शन केले आहे.

लष्करी ताकदीच्या या प्रदर्शनामुळे विकसनशील देशांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. त्या भीतीपोटीच त्यांनी अण्वस्त्रे हस्तगत करण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत. इराण आणि उत्तर कोरियाने अण्वस्त्रे तयार करण्याचे तंत्रज्ञान मिळवले व अण्वस्त्रे तयार केली आहेत. अमेरिकेत झालेले दहशतवादी हल्ले हे अमेरिकेच्या अतिरिक्त बळाच्या वापराचाच परिणाम आहेत. संहारक शस्त्रास्त्रे मिळवणे किंवा दहशतवादी मार्गाने हल्ले करणे एवढेच मार्ग अमेरिकेच्या विरोधात लढणा-यांसाठी शिल्लक राहीले आहेत.

**बहुध्रुवीय जगाचा उदय**

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आणि सोव्हिएट युनियन नष्ट झाल्यानंतर द्‌वीध्रुवीय व्यवस्थेची जागा एकध्रुवीय व्यवस्थेने घेतली. नव्या व्यवस्थेत अमेरिका ही एकच महासत्ता शिल्लक राहीली. काही काळ सर्व सत्ता तिच्याच हाती एकवटली होती. परंतु २१ व्या शतकाच्या सुरवातीपासून एकध्रुवीय व्यवस्था नष्ट होऊन त्याजागी बहुध्रुवीय व्यवस्था आकाराला येत आहे असे अनेक जणांचे म्हणणे आहे. त्यांच्या मते अमेरिकेला आव्हान देणा-या अनेक शक्ती पुढे येत आहेत. पुढील तीस-चाळीस वर्षात जगात अनेक महासत्ता उभ्या राहतील असे फ्रेंच अध्यक्ष निकोलस सरकोझी यांना वाटते. अमेरिकेचे महत्त्व कमी होईल असे त्यांचे म्हणणे आहे.

११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेत झालेल्या दहशतवादी हल्ल्याने एकध्रुवीयता विरुद्ध बहुध्रवीयता या चर्चेला वेग आला आहे. अमेरिका, ब्रिटन आणि त्यांची काही मित्र राष्ट्रे अजूनही एकध्रुवीय व्यवस्थेचे समर्थन करतात आणि अमेरिकेलाच एकमेव महासत्ता आणि जगाची नियंत्रक सत्ता मानतात. जगातील इतर सर्व देश मात्र हे मान्य करायला तयार नाहीत. ते बहुध्रुवीय व्यवस्थेचे समर्थन करतात. त्यांच्या मते एकध्रुवीय व्यवस्था मुळात असंतुलीत आहे. अमेरिकेच्या हातातील बेसुमार सत्ता कमी करून संतुलीत व्यवस्था निर्माण करायची असल्यास बहुध्रुवीय व्यवस्था आवश्यक आहे. फ्रान्स, रशिया, चीन, भारत, ब्राझिल आणि इतर अनेक देशांनी बहुध्रुवीयतेची संकल्पनेला पाठिंबा दिला आहे. त्यांच्या मते एकध्रुवीयतेची संकल्पना अवास्तव आहे.

**बहुध्रुवीयतेचे समर्थन**

a) अमेरिकेला एकमेव महासत्ता मानता कामा नये. केवळ लष्करी दृष्ट्या ती इतर सर्वांपेक्षा प्रबळ आहे. नागरी, आर्थिक, संस्थात्मक दृष्टीकोनातून पाहिल्यास जग बहुध्रुवीय आहे हे पटते. युरोपियन युनियन, जपान, रशिया, चीन आणि भारत हे देश आणि संघटनाही महासत्ता आहेत.

b) अमेरिकेने लष्करी बळाच्या आधारावर काही देशांमध्ये घुसखोरी केली आहे. काही देश उध्वस्त केले आहेत आणि काही ठिकाणी आपल्याला हव्या तशा राजकीय व्यवस्था निर्माण केल्या आहेत. परंतु हे सर्व अत्यंत खर्चिक आहे. या सर्व व्यवस्था अशाच प्रकारे कायम चालू ठेवणे अमेरिकेला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. २००१ मध्ये अफगाणिस्तानात आणि २००३ मध्ये इराकमध्ये अमेरिकेने हा अनुभव घेतला आहे. दोन्ही ठिकाणी पहिले काही आठवडे अमेरिकेला अपेक्षित यश मिळाले परंतु नंतर दोन्ही ठिकाणच्या मोहिमा खर्चिक होवू लागल्या आणि अपेक्षित यश मिळणेही कठीण होत गेले. १.५ हजार अब्ज डॉलर्स (1.5 trillion dollars) (एक हजार अब्ज म्हणजे एक ट्रीलीयन) इतका खर्च अमेरिकेला या मोहिमांवर करावा लागला. ६००० पेक्षा अधिक अमेरिकन सैनिक या मोहिमांमध्ये मृत्यूमुखी पडले. हिंसाचाराबद्दल जगभर अमेरिकेची नाचक्की झाली. त्या भागातील दहशतवाद्यांचा पूर्ण बिमोड करणे अमेरिकेला शक्य झालेले नाही. मधुन अधुन गनिमी काव्याच्या पद्धतीने हल्ले करून हे दहशतवादी आपले अस्तित्व दाखवून देतात.

c) अमेरिकेकडे लष्करी ताकद आहे परंतु त्यापलीकडे वाटाघाटी करण्यासाठीचे राजनैतिक कौशल्य अमेरिकेकडे फारसे नाही. राष्ट्रबांधणी, लोकशाहीचा प्रसार या बाबतचे कौशल्य अमेरिकेकडे नाही. अमेरिकेने इराकमध्ये सद्दामची राजवट उद्धवस्त केली परंतु अमेरिकेला इराकमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राखणे तितकेसे जमलेले नाही. अफगाणिस्तान मध्ये युद्धखोर जमातींनी परत आपले डोके वर काढले आहे. तिथे अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेचा पूर्ण बोजवारा उडाला आहे. अफूचे उत्पादन नव्याने वेगात सुरु झाले आहे. अफूच्या निर्यातीत अफगाणिस्तानने पुन्हा अव्वल क्रमांक मिळवला आहे. तालिबानी अतिरेक्यांची ताकद वाढली आहे. त्यांच्या दहशतवादी कारवाया पूर्वीइतक्याच जोमाने चालू आहेत. अफगाणिस्तान पलीकडे पाकिस्तानमध्येही त्यांच्या कारवायांचा विस्तार झाला आहे.

d) राजनैतिक क्षेत्रात अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान देण्यात आले आहे. उत्तर कोरियाचा अण्वस्त्र विकासाचा कार्यक्रम चीनच्या पाठिंब्यावर बिनदिक्कत पणे

चालू आहे. अमेरिका त्याबाबत फारसे काही करु शकलेली नाही. तसेच युरोपिय राष्ट्रांचा पाठिंबा असतानाही चीन आणि रशियाच्या विरोधामुळे अमेरिका इराणवरही फारसा दबाव आणू शकलेली नाही. इराणचा अणुतंत्रज्ञानाच्या विकासाचा कार्यक्रम तसाच चालू आहे. इराकसारखा अमेरिकेला आमच्यावर हल्ला करता येणार नाही. तसे झाल्या आम्ही योग्य प्रतिकार करु अशी धमकी इराणनेच अमेरिकेला दिली आहे.

e) संयुक्त राष्ट्रे, युरोपियन युनियन आणि नाटो या संस्थांच्या संमतीने किंवा त्यांच्या मार्फत केलेल्या कारवाईला अधिमान्यता मिळते. १९९१ च्या पहिल्या आखाती युद्धासाठी अमेरिकेने संयुक्त राष्ट्रांची मान्यता मिळवली होती. त्यामुळे तिला या युद्धात ५० ते ६० अब्ज डॉलर्सची मदत आंतरराष्ट्रीय समुदायाकडून मिळाली. तसेच इतर अनेक बाबतीतही सहकार्य मिळाले. याउलट २००३ च्या दुस-या आखाती युद्धात संयुक्त राष्ट्रांची स्पष्ट मान्यता मिळाली नसल्यामुळे अमेरिकेला मित्र राष्ट्रांनी कोणतीही आर्थिक मदत आणि इतर सहकार्य दिले नाही. तुर्कस्तानने आधी दिलेली मदत थांबवली.

f) अमेरिकेची अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पन्न १४ हजार अब्ज डॉलर्स इतके आहे. जगाच्या एकूण उत्पन्नात अमेरिकेचा वाटा २० टक्के इतका आहे. परंतु यापुढे अमेरिकेचे हे स्थान असेच अबाधित राहील असे सांगता येत नाही. काही आशियायी राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था अमेरिकेपेक्षा दुप्पट, तिप्पट वेगाने वाढत आहेत. शिवाय सध्या अमेरिकेची अर्थव्यवस्था दुस-या महायुद्धानंतरच्या सर्वात भयंकर मंदीला तोंड देत आहे. चीन, कुवेत, रशिया, सौदीअरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या देशांनी सरकारी सार्वभौम निधी उभे केले आहेत. त्यामुळेही अमेरिकेच्या आर्थिक स्थानावर परिणाम झाला आहे. या सरकारी निधींची एकत्रित किंमत साधारणपणे ३ हजार अब्ज इतकी झाली आहे. त्यामधील पैसा मुख्यतः तेल आणि वायूच्या निर्यातीमधून मिळाला आहे. दरवर्षी १ हजार अब्जांनी हे निधी वाढत आहेत. अमेरिकेतील कंपन्यांना त्यांची गरज भासत आहे.

एप्रिल २००९ च्या पहिल्या आठवड्यात लंडन मध्ये जी-२० राष्ट्रांची शिखर परिषद घेण्यात आली. त्यामध्ये मुख्यतः जागतिक मंदीवर चर्चा करण्यात आली. या परिषदेच्या निमित्ताने जगाची बहुध्रुवीय व्यवस्थेकडे चाललेली वाटचाल स्पष्ट झाली. जी-२० (Group of twenty nations) हा १९९९ साली आशियाई आर्थिक संकटानंतर स्थापन झालेला १९ राष्ट्रांचा आणि युरोपियन

युनियनचा मिळून तयार झालेला गट आहे. यामध्ये अर्जेन्टीना, ऑस्ट्रेलीया, कॅनडा, ब्राझिल, भारत, चीन, फ्रान्स, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, इटली, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया, तुर्कस्तान, अमेरिका आणि ब्रिटन या १९ देशांचा आणि युरोपियन युनियनचा समावेश आहे.[iii]

g) सोव्हिएट युनियनच्या पाडावानंतर त्याची जागा घेणा-या रशियाला नव्या अर्थव्यवस्थेमध्ये सामील करुन घेण्यात आले. रशियाने नाटोबरोबर शांतता करारही केला. परंतु १९९३ पासून रशियाने स्वतंत्र परराष्ट्र धोरण अवलंबले आहे. आखातात आणि बाल्कन प्रदेशातील काही प्रश्नांच्या संदर्भात त्यांनी घेतलेल्या काही निर्णयांवरून हे स्पष्ट होते. अमेरिकेच्या काही निर्णयांमुळे अमेरिका-रशिया संबंधात तणाव निर्माण झाला आहे. उदा.- पोलंड आणि झेक प्रजासत्ताकामध्ये क्षेपणास्त्र विरोधी व्यवस्था उभी करणे, युक्रेन आणि जॉर्जिया या दोन पूर्वीच्या सोव्हिएट मधील घटक असलेल्या देशांना नाटो मध्ये सामील करुन घेणे इत्यादी. दुस-या बाजूस रशियाने अमेरिकेचा सल्ला न मानता आर्थिक आणि राजकीय विकासाचा स्वतंत्र मार्ग स्वीकारला आहे त्यामुळे तणावामध्ये वाढ झाली आहे. ऑगस्ट २००८ मध्ये जॉर्जिया मधील दक्षिण ओसेटीया आणि अबखाजिया या दोन प्रांतांना स्वतंत्र देश म्हणून मान्यता देऊन रशियाने अमेरिकेच्या वर्चस्वाला खुले आव्हान दिले आहे. (कौकॅकस Caucasus भागातील जॉर्जिया मधुन आशिया आणि युरोपला तेल आणि वायूचा पुरवठा होतो.) फेब्रुवारी २००८ मध्ये कोसोवोने सर्बिया पासून स्वातंत्र्य घोषित केले. अमेरिकेने त्याला पाठिंबा दिला तर रशियाचा त्याला विरोध होता. जग बहुध्रुवीयच असले पाहिजे, एकध्रुवीयता स्वीकारणे अशक्य आहे, कोणचेही वर्चस्व मानणे शक्य नाही, ज्या जागतिक व्यवस्थेत केवळ एकाच बाजूने निर्णय घेतले जातात, मग तो निर्णय घेणारा देश म्हणजे अमेरिका असली तरी अशी व्यवस्था स्वीकारणे केवळ अशक्य आहे, असे जग हे असंतुलीत जग मानले पाहिजे आणि त्यामुळेच अशा जगात अनेक संघर्षांची शक्यता निर्माण होते असे मत रशियाचे अध्यक्ष दिमित्री मेद्वेदेव्ह यांनी व्यक्त केले आहे.

अशाप्रकारे अनेक राजकीय विश्लेषक आणि विचारवंतांच्या मते सध्या संक्रमण अवस्थेतून जात आहे. हे संक्रमण एकध्रुवीय व्यवस्थेकडून बहुध्रुवीय व्यवस्थेच्या दिशेने होत आहे. सॅम्युएल हंटींग्टन यांच्या मते शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय राजकारणात एक-बहुध्रुवीय व्यवस्था (uni-multipolar system) निर्माण झाली आहे. यामध्ये एक महासत्ता आणि इतर अनेक महत्त्वाच्या सत्ता आहेत. याउलट रिचर्ड एन. हास यांच्या मते (फॉरेन अफेअर्स मे/जुन २००८ च्या अंकातील ‘दी एज ऑफ नॉन

पोलॅरिटी' या आपल्या लेखात त्यांनी हे मत मांडले आहे) "अमेरिकेचे एकध्रुवीय साम्राज्य नष्ट झाले आहे. २१ व्या शतकात ध्रुवीयता नष्ट होईल. आंतरराष्ट्रीय संबंध ध्रुवीयतेवर आधारित असणार नाहीत. सत्ता विखुरलेली असेल. राष्ट्रराज्यांचा प्रभाव कमी होऊन राज्येतर घटकांचा प्रभाव वाढेल.

त्यांच्या मते जगातील सहा प्रमुख सत्तांच्या पलीकडे ब्राझिल, मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, इस्त्राइल, सौदी अरेबिया इत्यादी अनेक प्रादेशिक सत्ता आहेत. काही जागतिक संघटना सत्तेचे केंद्र बनू पाहत आहेत. यामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, संयुक्त राष्ट्रे, जागतिक बँक यांचा समावेश होतो. त्याबरोबरच आफ्रिकन युनियन, आसियान, युरोपियन युनियन यासारख्या काही प्रादेशिक संघटनांचा समावेश आहे. उर्जा, वित्त आणि उत्पादनाच्या क्षेत्रातील काही जागतिक दर्जाच्या मोठ्या कंपन्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. अल् जाझिरा, बीबीसी आणि सीएनएन यासारख्या जागतिक दर्जाच्या माध्यमांचे वेगळे स्थान आहे. हमास, हेजबुल्ला, अल् कायदा आणि तालिबान हे दहशतवादी गट महत्त्वाचे आहेत. तसेच जगभरात दिसणा-या बिगर शासकीय संघटनांचे आपले वेगळे स्थान आहे. एकूण जगभरात सत्ता विखुरलेल्या स्वरुपात आहे. ती कोणा एकाच्या हाती एकवटलेली नाही.

सत्तेचे विकेंद्रीकरण आणि बहुदध्रुवीयते कडे वाटचाल हे केवळ काही राज्यांच्या वाढलेल्या ताकदीमुळे किंवा अमेरिकेचा प्रभाव कमी झाल्यामुळे घडले आहे असे नाही. हा जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा एक अटळ परिणाम आहे.

जग बहुध्रुवीय आहे की ध्रुवीयताच संपली आहे याबद्दल आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासकांमध्ये आणि विश्लेषकांमध्ये एकमत असणार नाही पण यापैकी बहुतेक जण एकध्रुवीयता इतिहासजमा झाली आहे हे मान्य करतील. अमेरिकेचा नवे अध्यक्ष बराक ओबामा यांच्या परराष्ट्र धोरणामध्ये व्यवहारिकतेची जाण (sense of pragmatism) दिसून येते. ओबामा म्हणतात "मी विविध दृष्टीकोनांचा आदर करण्यास बांधील आहे, माझे मत दुस-यावर लादण्यापेक्षा मला मतैक्य महत्त्वाचे वाटते...जग ही एक अत्यंत गुंतागुंतीची जागा आहे आणि आम्ही इतर देशांबरोबर भागीदारीत काम करणार आहोत." आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा दर्जा सुधारण्याची सर्वाधिक क्षमता अमेरिकेकडेच आहे हे नाकारता येणार नाही.

---

[i] http://www.namegypt.org/en/Pages/default.aspx १५ व्या नाम शिखर परिषदेचे संकेतस्थळ

[ii] http://en.wikipedia.org/wiki/List_of_United_States_military_bases

[iii] http://www.g20.org/

US military bases world wide
http://en.wikipedia.org/wiki/List_of_United_States_military_bases
US military base in Australia – Satellite tracking facility
http://en.wikipedia.org/wiki/Pine_Gap
Diego Garcia
http://en.wikipedia.org/wiki/British_Indian_Ocean_Territories
http://en.wikipedia.org/wiki/Diego_Garcia
Defence journal
http://www.defencejournal.com/2009-3/index.asp